बी.ए. द्वितीय वर्ष - हक आर्ज माध्यमासाठी लेखन कौशल्ये

## नभोवाणी संप्रेषण

प्रास्ताविक :-

आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये लोकशाही व्यवस्थेतील सर्व सामान्य नागरिकाला अत्याधुनिक ज्ञानही तितकेच असणे महत्वाचे आहे. त्यामध्ये सर्व चालु घडामोडीविषयी अद्ययावत माहिती असणे अत्यावश्यक आहे. या माहितीआधारेच एका जबाबदार नागरिकाची भूमिका यशस्वीपणे पार पाडणारा नागरिक निर्माण होवू शकेल या-दृष्टीने नभोवाणीचे स्थान अधिक महत्त्वपूर्ण ठरणारे आहे.

नभोवाणी हे केवळ एका विशिष्ठ भागापुरते संप्रेषण माध्यम नसून ते देशाच्या कानाकोपऱ्यात माहिती पाठविण्याचे, लोकांना शिक्षित करण्याचे एक प्रभावी संप्रेषण माध्यम आहे. या माध्यमाद्वारे विविध समाजातील लोकसंस्कृती, लोकरुढी, लोकपंरपरा, लोककला बरोबरच इतर प्रादेशिक भाषेमधील विविध वाङ्मयीन अविष्काराचे संवर्धन करण्याचे एक महत्वपूर्ण माध्यम म्हणून नभोवाणी संप्रेक्षणाकडे पहावे लागते. थोडक्यात संप्रेषण - कम्युनिकेशन हा मानवी संस्कृतीचा एक महत्वपूर्ण घटक आहे. दैनंदिन जीवनात आपण आचार आणि विचारांची देवाण घेवाण करण्या-साठी नेहमी उत्सुक असतो. उदा. हवामान अंदाज बाजारभाव राजकीय, सामाजिक, अर्थिक उलाढाली, कौटुंबिक अडचणी, व अन्य चित्तथरारक अनुभव अशा अन्य घटनाबाबत एकमेंकाशी सतत बोलत असतो. हे परस्पर संवादात्मक बोलणे आपणा सर्वांचेच जगण्याचे अत्यावश्यक व अविभाज्य अंगच बनले आहे. त्यामुळे एखादया दिवशी जर मौन पाळण्याचा प्रयत्न केला तर आपणास अधिक चुकल्यासारखे वाटते. अर्थातच "मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे" अशी माणसाची एक व्याख्या केली जाते. ही सामाजिकता संप्रेषणाशिवाय संभवूच शकत नाही.

### * संप्रेषणाचे माध्यम :-

संप्रेषण तथा कम्युनिकेशन संवाद साधण्याचे अनेक महत्वपूर्ण असे माध्यमे आहेत. त्यामध्ये सर्वप्रथम हावभाव, खाणाखुणा, स्पर्श, चित्कार, आरोळी, चित्र, तसवीर, तक्ता, चिन्हे, यांचा उल्लेख करता येइल. एखादा मूकबधीर व्यक्ती इतरांशी

खाणाखुणांच्या माध्यमातून संप्रेषण साधते. नवजात अर्भक रडून हुंकार देऊन आपल्या मातेशी संवाद साधते. रस्त्यावर वाहतुकीसंबंधी विविध प्रकारच्या खुणांचे, चिन्हांचे फलक लावलेले असतात. त्यातून वाहन चालकांना वळणाची वळणे, गतिरोधक, घाटाचा चढाव-उतार आदि धोका-दायकांची माहिती मिळते. युद्धामध्ये 'पांढरे निशाण फडकावले असता शरणागतीसंबंधीची सूचना समजली जाते. भित्तीचित्र, रस्त्यांच्या कडेला उभारलेले मोठे फलक, शिलालेख, स्तंभ, स्तूप, आदिंचा वापर संप्रेषणासाठी केला जातो.

* **संप्रेषणाचे साधन**

"ध्वनी हे संप्रेषणाचे एक मूलभूत साधन आहे." आदिम कालपासून त्याचा वापर होत आला आहे. शरीर माणसाचे ओरडणे, दुःखी माणसाचे रडणे, वेदनांनी त्रस्त असलेल्या व्यक्तीचे कण्हणे, आनंदी व्यक्तीचे हसणे अशा वेगवेगळ्या क्रिया प्रक्रियांतून व्यक्त होणारे ध्वनी आपणास बरेच काही सांगून जातात. सामूहिक संप्रेषणात ढोल नगाऱ्यांचा आवाज, घंटा, भोंगा इ. आवाजांचा वापर होत आला आहे. परिणामी संस्कृतीच्या वाटचालीप्रमाणे काही ध्वनींना विशिष्ट अर्थ प्राप्त होत गेले. उदा. नगर परिषदेचा विशिष्ट वेळ जाहीर करणारा भोंगा, अग्निशामक दलाच्या आगीच्या बंबाची घंटा, शाळेची घंटा अशी अन्य उदाहरणे सांगता येतील.

शब्दांची निर्मिती ध्वनीतून झाली तेव्हा संप्रेषणाचे स्वरूप अधिक विकसित झाले. परिणामी भाषेचाही विकास ~~होत गेला~~ होऊन भाषेचे शास्त्र निर्माण झाले. या शास्त्राच्या माध्यमातून मानव आपल्या मनातील गुंतागुंतीच्या भावना, जीवनविषयीचे गूढ अनुभव, विविध विषयावरील निरीक्षणे-माहिती इतरांपर्यंत पोहचवू लागला. त्यामुळे शब्द लिखित स्वरूपात साकार झाला. आणि लिपीचा विकास होत गेला. त्यामुळे संप्रेषणाच्या कक्षा अधिक रुंदावत गेल्या.

* **लिखित संप्रेषण**

मुद्रणकलेचा शोध लागेपर्यंत लिखित संप्रेषण मर्यादित स्वरूपाचे होते. प्राचीन काळामध्ये सर्व पुस्तके, ग्रंथ काव्यसंग्रह स्वलिखित, हस्तलिखित असल्यामुळे त्यामध्ये बराच कालावधी जात असे. त्याला खर्चही अधिक येत असल्यामुळे

पुस्तक व्यवहार हा मर्यादित स्वरूपामध्ये होता. मोठमोठे राजे-राजवाडे सरदार-दरकदार, श्रीमंत यांनाच पुस्तके आपल्या संग्रही बाळगणे शक्य होते. कालांतराने मुद्रणकलेचा शोध लागला व ग्रंथव्यवहार झपाट्याने वाढू लागला. कमी कालावधीत असंख्य ग्रंथसंपदा छापली जाऊ लागली. त्यांच्या किंमतीही कमी झाल्या. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीला ज्ञानाचे भांडार उपलब्ध होऊ लागले. आजच्या काळाचा विचार केला तर, सद्यस्थिती ही विज्ञान तंत्रज्ञानामुळे अधिक ज्ञानसंपन्न व गुणसंपन्न निर्माण करणारी आहे. ते केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. असे असले तरी लिखित संप्रेषण केवळ मर्यादित लोकांपुरताच व्यवहार आहे कारण यामध्ये केवळ साक्षर असणाराच वर्ग, पुस्तके, वर्तमानपत्रे, पाक्षिके, मासिके साप्ताहिके, घडीपत्रकासारखे अन्य ग्रंथांचे वाचन करून ज्ञान प्राप्त करू शकतात. व अन्य अशिक्षित साक्षर नसलेल्या व्यक्तींना त्याचा काहीही उपयोग होणार नाही हे मान्य करावे लागते. याउलट बोलीभाषा ही निरक्षर माणसालाही आपल्या कक्षेत घेऊ शकते.